महाराष्ट्र शासन

क्रमांक : जमीन २६१०/३४१/प्र.क्र.७९/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १९ जून, २०१०

प्रति

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१.

विषय : जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे-कांजूर, ता.कुर्ला, न.भू.क्र.६५७ अ येथील जॉली ब्रदर्स प्रा.लि. यांना भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीतून ३५० मीटर लांबीचे पाईप टाकण्यास ना हरकत देणेबाबत.

संदर्भ : वरील विषयावरील आपले क्र.१७/अ/३ डी/कावि-४१७/२०१०, दि.८.४.२०१० चे पत्र

कार्यकारी अभियंता (सिव्हरेज प्रोजेक्ट), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मौ.कांजूर, ता.कुर्ला, न.भू.क्र.६५७ अ मधील शासकीय जागेतून ९०० मी.मी. व्यासाची मलनिस्सारण वाहिनी टाकण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे. या पाईप लाईनसाठी त्यांना ०.९० मी. X ३५० मी. = ३१५ चौ.मी. क्षेत्राची आवश्यकता आहे. या मलनिस्सारण वाहिनीमुळे मौ.कांजूर व मौ.विक्रोळी विभागातील मलनिस्सारण कामी व्यापक प्रमाणात मदत होणार आहे. या वाहिन्यांचे नेटवर्क भांडूप पंपींग स्टेशनला जोडण्यात येणार आहे. मुंबई महानगरपालिकेने सादर केलेल्या नकाशानुसार पाईप लाईनसाठी प्रस्तावित केलेली जमिन ही प्रस्तावित २७.४५ मी. विकास रस्त्याखालील आहे. सद्यस्थितीत हा रस्ता विकसित झालेला नसून क्षेत्र पडीक आहे. सद्यस्थितीत तेथे ७०० मी.मी. व्यासाची पाईपलाईन असून ती कार्यरत आहे. या कामासाठी केंद्र शासनाकडून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण



Scanned by CamScanner

अभियानांतर्गत अर्थसहाय्य प्राप्त होणार असल्याने ना हरकत प्रमाणपत्र देण्याची पालिकेने विनंती केली आहे. प्रश्नाधीन जागा जॉली ब्रदर्स यांना शासनाने भाडेपट्टयाने दिलेली असून त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस मलनिस्सारण वाहिनी टाकण्यास ना हरकत दिली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अपेक्षित वापर हा सार्वजनिक व लोकोपयोगी असल्याने जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटतील अशा व खालील अटींच्या अधीन राहून महानगरपालिकेस या शासकीय जागेतून पाईप लाईन टाकण्यास परवानगी देण्यास शासनाची ना हरकत देण्यात येत आहे :-

**<u>अटी</u> :**

१) मलनिस्सारण वाहिनी टाकण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकरणाच्या आवश्यक त्या परवानग्या घेण्यात येतील.

२) जागेतून पाईपलाईन टाकण्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा वापर महानगरपालिकेस करता येणार नाही.

३) जागेच्या अपेक्षित वापरामुळे सी.आर.झेड.-१ च्या तरतुदीचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता बृहन्मुंबई महानगरपालिकेने घ्यावी.

( वै. भू. लटके )<br>
अवर सचिव<br>
महसूल व वन विभाग

प्रत :-

१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

२) कार्यकारी अभियंता (सिव्हरेज प्रोजेक्ट), सी-११, मुंबई महानगरपालिका

३) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

**प्रशासकिय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१**

**Phone No.022-26556799, 26550111 Fax No.6556805 Email ID collrmsd@yahoo.com**


13

**क्र/सी/कार्या-३डी/एल- ४१७/२०१०**
**दिनांक : /०७/२०१०**
12 AUG 2010

प्रति

मा. आयुक्त,
बृहन्मुंबई महानगर पालिका,
महानगर पालिका मुख्य कार्यालय,
मुंबई- सी.एस. टी.
मुंबई-४००० ०१.

**विषय :-जमीन मुंबई उपनगर जिल्हा**
**मौजे कांजूर ता. कुर्ला न.भू.क्र. ६५७ अ येथील जॉली ब्रदर्स प्रा. लि. यांना भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीतून ३५० मीटर लांबीचे पाईप टाकण्यास ना हरकत पत्र देणेबाबत.**

महोदय,

कार्यकारी अभियंता (सिव्हरेज प्रोजेक्ट ) बृहन्मुंबई महानगर पालिका यांनी मौजे कांजूर ता. कुर्ला न.भू.क्र. ६५७ अ मधील शासकीय जागेतून ९०० मी.मी. व्यासाची मलनिस्सारण वाहिनी टाकण्यासाठी ना हरकत प्रमाण पत्र देण्याची विनंती केली आहे. या पाईप लाईनसाठी त्यांना ०.९० मी x ३५० मी. = ३१५ चौ.मी. क्षेत्राची आवश्यकता आहे. या मलनिस्सारण वाहिनीमुळे मौजे कांजूर व मौजे विक्रोळी विभागाकडील मलनिस्सारणकामी व्यापक प्रमाणात मदत होणार आहे. या वाहिन्यांचे नेटवर्क भांडूप पंपींग स्टेशनला जोडण्यात येणार आहे. मुंबई महानगर पालिकेने सादर केलेल्या नकाशानुसार पाईप लाईनसाठी प्रस्तावित केलेली जमिन ही प्रस्तावित २७.४५ मी. विकास रस्त्याखालील आहे. सद्यस्थितीत हा रस्ता विकसित झालेला नसून क्षेत्र पडीक आहे. सद्यस्थितीत तेथे ७०० मी. मी. व्यासाची पाईप लाईन असून ती कार्यरत आहे. या कामांसाठी केंद्र शासनाकडून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानांतर्गत अर्थ सहाय्य प्राप्त होणार असल्याने ना हरकत प्रमाणपत्र देण्याची पालिकेने विनंती केली आहे. प्रश्नांधीन जागा जॉली ब्रदर्स यांना शासनाने भाडेपट्टयाने दिलेली असून त्यांनी बृहन्मुंबई महानगर पालिकेस मलनिस्सारण वाहिनी टाकण्यास ना हरकत दिली आहे. बृहन्मुंबई महानगर पालिकेचा अपेक्षित वापर हा सार्वजनिक व लोकोपयोगी असल्याने शासन, महसूल व वन विभागाने त्यांचेकडील पत्र क्र. जमिन २६१०/३४१ /प्र.क्र. ७९/ज-३ दि. १९/६/२०१० अन्वये ना हरकत दिली आहे.

वरील उक्त संदर्भात शासनाचे ना हरकत पत्रास अनुसरुन महानगर पालिकेस मौजे कांजूर ता.कुर्ला न.भू.क्र. ६५७ अ मध्ये ०.९० मी x ३५० मी = ३१५ चौ.मी. या शासकीय जागेतून पाईप लाईन टाकण्यास परवानगी देण्यांस खालील अटी व शर्तीस अधीन या कार्यालयाची ना हरकत देण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

**अटी / शर्ती :**

१) मल:निस्सारण वाहिनी टाकण्यासाठी संबंधीत प्राधिकरणाच्या आवश्यक त्या परवानग्या घ्याव्यात.

२) जागेतून पाईपलाईन टाकण्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा वापर महानगर पालिकेस करता येणार नाही.

३) जागेच्या अपेक्षित वापरामुळे सी.आर.झेड-१ च्या तरतूदींचे उल्लंघन होणार नाही. याची दक्षता बृहन्मुंबई महानगर पालिकेने घ्यावी.

४) पाईप लाईन टाकण्याबाबत नियोजित केलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त अतिरिक्त जादा क्षेत्राचा वापर करु नये.

५) पाईप लाईन टाकणेच्या क्षेत्रास भविष्यात शासनाने भाडेपट्ट्याची रक्कम अथवा इतर रकमेची आकारणी केल्यास ती रक्कम विनाअट महानगर पालिका अदा करेल.

६) पाईप लाईन टाकणेचे जागेचे सिमाकंन / हद्द नगर भूमापन अधिकारी मुलूंड व बृहन्मुंबई महानगर पालिका यांनी संयुक्तपणे निश्चित करावी.

७) पाईप लाईन टाकणेचे क्षेत्राचे गौण खनिजावर शासनाचा हक्क राहील.

८) पाईप लाईन टाकण्याचे काम २ वर्षाचे मुदतीमध्येच पूर्ण करुन करावे.

९) पाईप लाईन टाकण्याचे कामामुळे आसपासच्या परिसरात पाणी शिरणार नाही व पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बदलणार नाही याबाबत मुंबई महानगर पालिकेने उचित उपाय करावी.

१०) उपरोक्त अटी / शर्तींचा भंग झाल्यास सदरची ना हरकत परवानगी तात्काळ रद्द करण्यात येईल.

११) वरील अटी / शर्ती मान्य असल्याबाबतचे नोटराईज हमीपत्र रक्कम रु. २००/- चे स्टॅम्प पेपरवर महानगर पालिकेने या कार्यालयास तात्काळ सादर करावे.

अप्पर/सही नावाने मा. जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

(सही)
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रत : १) मा. अपर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग यांजकडे शासन पत्र क्र. जमिन २६१०/३४१ /प्र.क्र. ७९/ज-३ दि. १९/६/२०१० अन्वये माहिती करीता सविनय सादर.

२) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडे माहिती करिता सविनय.

३) कार्यकारी अभियंता (सिव्हरेज प्रोजेक्ट ) सी-११, बृहन्मुंबई महानगर पालिका ७०६/७०८, ७ वा मजला, पंत नगर म्युनिसिपल गॅरेज बिल्डिंग, घाटकोपर बस डेपो मागे, घाटकोपर (पूर्व), मुंबई-७५.

४) उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडे रवाना.

५) तहसिलदार मुलूंड यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाही करीता रवाना.

६) नगर भूमापन अधिकारी, मुलूंड यांचेकडे माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(सही)
९/२/१९

अप्पर/सही नावाने मा. जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

(सही)
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

Scanned by CamScanner